साक्षीदार क्र ०९ ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–पपिता विठ्ठलराव मेंघरे,
वय:–४२ वर्ष, व्यवसाय–शेती,
राह.पिपरा, ता.उमरेड, जि.नागपूर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री.व्ही.यु.मिरचे यांच्या मार्फत</u>**

१. घटना ही अंदाजे चार–पाच वर्षापुर्वीची आहे. घटनेच्या वेळी मी व माझे पति घरात होतो. घटनेच्या वेळी आम्हाला भांडणाचा आवाज आला परंतु आम्ही बाहेर निघुन काही बघीतले नाही. याव्यतिरिक्त घटनेबाबत मला काही माहित नाही. पोलिसांनी माझी विचारपुस केली नाही व माझे बयाण घेतले नाही. मी आरोपींना ओळखते.

**<u>सदर साक्षीदार अभियोग पक्षास कोणत्याही मुद्दयावर सहकार्य करीत नसल्याने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, परवानगी देण्यात येते.</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, दि.२७/०८/२०१८ मी व माझे पति आमच्या घराजवळील ओट्यावर बसुन होते व बाजुला देवराव मेंघरे, त्याची पत्नी शालीनी व मुलगा अनिकेत असे बसुन होते तेव्हा ग्रामपंचायतचे सचिव श्री.वाधानी, सरपंच सौ काचन मांडसकर, उपसरपंच कवडु कन्नाके, सदस्य विनोद म्हैसकर हे आले तेव्हा देविदास मेंघरे याने आज कोणाची मोजमाप आहे असे म्हटले असता, तेव्हा त्यांनी तुमच्या घराचे आहे असे म्हटले, तेव्हा देविदास मेंघरे याने आमच्या अर्जाचे काय झाले? असे म्हटले त्यावर शंकर रामदास मेंघरे हा देविदास मेंघरेसोबत वादविवाद करू लागला, तेव्हा पाउस सुरू झाल्याने ग्रामपंचायतचे लोकं बाजुला गेले तेव्हा देवराव मेंघरे यांनी म्हटले की, आणा रे काड्या, त्यावेळी आरोपी क्र.१ देवराव मेंघरे, शंकर मेंघरे, लोभा मेंघरे, रामा मेंघरे, सचिन मेंघरे, कल्पना मेंघरे, चंद्रकला मेंघरे हे आले व त्यांनी जागेबाबत भांडण करून देविदास मेंघरे याला शंकर मेंघरे याने पकडुन ठेवले व लोभा मेंघरे यांनी काडीने व सचिन मेंघरे याने लोखंडी सळाखीने मारहाण केली व अनिकेत याला देवराव व रामा यांनी

हाताबुक्कीने व काडीने मारहाण केली, सौ.शालीनी हीला सौ. कल्पना मेंघरे व सौ. चंद्रकला मेंघरे यांनी ओढताण करून डोक्याचे केस ओढले व देविदास मेंघरे यांच्या डोक्याला मार लागल्याने त्यांचे डोके फुटले व रक्त निघाले. आता मला माझ्या बयाणातील **अधोरेखांकित भाग अ** वाचुन दाखविण्यात आला तो पोलिसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**आरोपीतर्फे ॲड.कु.के.एस.चिचघरे यांनी उलटतपास नाकारला.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा.

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि०२.०५.२०२६

समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड